# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवीसाठी ''विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' आणि 'रणांगण' कलाकृतींचा तुलनात्मक अभ्यास'' या विषयावरील प्रबंधिका सादर करीत असताना या अभ्यासासाठी ज्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

आज ही प्रबंधिका पूर्णावस्थेत जात असताना मला अतिशय आनंद होत आहे. या प्रबंधिकेच्या यशस्वीतेमध्ये माझे मार्गदर्शक डॉ. वसंत नरहर कुबेर यांचा वाटा अधिक आहे. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव व मार्गदर्शन करण्याची सोपी व घरगुती पद्धती यामुळेच या प्रबंधिकेचा काम मी वेळेत पूर्ण करु शकलो. नेमक्या पद्धतीने लेखन व्हावे यासाठी दक्ष असणारे डॉ.कुबेरसर यांचा खरोखरच मी ऋणी आहे. त्यांनी केलेल्या सूचनामुळे अभ्यासाला व लेखनाला योग्य दिशा मिळाली. प्रबंधिकेतील प्रकरण तिसरे लिहताना हा विषय मध्येच सोडावा असे वाटल्याने वाचन–लेखनाचे काम ही काही दिवस बंद ठेवले मात्र, प्रत्यक्ष सरांच्या ज्या उपदेशानं प्रेरणेतूनच मी हे लेखन पूर्ण करु शकलो असल्याने त्यांच्या ऋणातून मुक्त व्हावे वाटत नाही.

प्रबंधिकेच्या पूर्णत्वाने मनात एक प्रकारे आनंद निर्माण होत असताना एक शल्यही बोचत राहतेच. अभ्यासाच्या निमित्ताने सरांशी झालेली ओळख आणि त्यातून नकळत जोडलेलं नातं. सरांच्यामुळे त्यांच्या कुटुंबियांशी निर्माण झालेली जवळीक यातून बाहेर पडणे खरोखरच कठीण आहे. पुढे सरांचा सहवास व मार्गदर्शन मिळेल न मिळेल या कल्पनेनं माझे मन गहिवरुन येते. त्यांचे आभार मानण्यासाठी माझे शब्द मला अपुरे वाटत आहेत.

संशोधनासाठी आवश्यक ग्रंथसंपदा मिळविण्यासाठी सद्‌गुरु गाडगे महाराज ग्रंथालयाचे एस्.एन्.भोसले, ए.जी.केदार, कराड नगरपालिका नगर वाचनालयाचे ए.जे. आदमाने, ए.जे.आत्तार, वेणूताई चव्हाण ट्रस्ट व ग्रंथालयाचे मा.विठ्ठलराव पाटील, पुणे शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सु.ना.कांबळे, प्रादेशिक ग्रंथालय मासिक विभाग, पुणेचे कर्मचारी, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय दादरचे कर्मचारी व मराठी साहित्य परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूरचे ग्रंथालय व मासिक विभागाचे कर्मचारी, उंडाळे येथील जोतिर्लिंग वाचनालयाचे सुहास पाटील यांनी मनापासून सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

कादंबरीचे लेखक विश्वास पाटील यांच्याशी या अभ्यासाच्या निमित्ताने प्रदीर्घ चर्चा केली. मनमोकळेपणाने त्यांनी दिलेली उत्तरं, व त्यांच्या लेखनामागच्या भूमिकाचा मला माझ्या अभ्यासासाठी उपयोग झाला. नाटकाचे दिग्दर्शक वामन केंद्रे यांनीही मी मुंबईला गेल्यावर चांगलंच स्वागत केलं. लेखकाच्या भूमीतून आलेला विद्यार्थी म्हणून त्यांनी माझं कौतुक करुन नाटक समजून सांगितले. त्यांच्यामुळेच मला 'रणांगण' नाट्यनिर्मितीची खरी प्रक्रिया समजली आणि त्यामुळेच नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वी किती कसरती कराव्या लागतात याची जाणीव करुन झाली. लेखकाबरोबरच त्यांचेही मनःपूर्वक आभार.

याशिवाय माझ्या लिखाणाची आस्थेवाईक चौकशी करणारे प्रा.ता.रा.भोसले, प्रा.रत्नप्रभा हिरवे, डॉ.सुमन पाटील, डॉ.कन्हैया कुंदप यांचाही मी आभारी आहे.

अभ्यासासाठी व संदर्भ साहित्य मिळविण्यासाठी प्रा.जयसिंगराव कदम, गणेश चवरे, यशवंत कांबळे, शिवाजी पाटील याशिवाय ज्यांनी मला प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचा ही मी ऋणी आहे. छपाईचे काम कमी वेळात व अधिक बिनचूक करुन देणारे माझे मित्र महेश माने यांचाही मी आभारी राहीन. या सर्वांचे स्नेहबंध असेच वृद्धींगत व्हावेत हीच अपेक्षा.

– श्री.प्रदीप रवलेकर